# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## प्रसिध्दीपत्रक

**(जाहिरात क्र. ०५/२०२३, जाहिरात क्र. ०६/२०२३, जाहिरात क्र. ०७/२०२३ व जाहिरात क्र. ०८/२०२३ )**

-------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत खालील नमूद पदे भरण्यासाठी दि. २९/१२/२०२३ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती. उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज भरणेकरीता दि.२०/०६/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

| अनु.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नांव |
|---|---|---|
| १ | ०५/२०२३ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| २ | ०६/२०२३ | विद्युत सहाय्यक |
| ३ | ०७/२०२३ | पदवीधर शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |
| ४ | ०८/२०२३ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |

२. दरम्यानच्या काळात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि.२७.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरीता आरक्षण जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने उक्त जाहिरातीकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरीता आरक्षण निश्चित करुन सुधारीत रिक्त पदांचा तपशील दि. २१/०६/२०२४ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातून (EWS) अर्ज केलेल्या उमेदवारांनी एसईबीसी प्रवर्गाचा विकल्प सादर करणे व इतर मार्गदर्शक सूचनाही प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

**३.** सदर मूळ जाहिरातीस अनुसरुन ज्या एसईबीसी उमेदवारांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) व खुल्या प्रवर्गातून अर्ज भरले आहेत त्यांचेसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (SEBC) प्रवर्गाचा विकल्प सादर करणेबाबची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येऊन विकल्प सादर करण्याची अंतिम तारीख १७/०७/२०२४ अशी दिलेली होती. तथापि, बहुतांश एसईबीसी उमेदवारांनी त्यांना जातप्रमाणपत्र तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र मिळणेकरिता विलंब होत असलेने विकल्प सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे.

**४. सबब, एसईबीसी उमेदवारांना विकल्प सादर करणेबाबची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर दि. २२/०७/२०२४ पासून दि. ०४/०८/२०२४ पर्यंत पुनश्च उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**५.** उक्त संवर्गाच्या मूळ जाहिराती तसेच त्यानुषंगाने प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकातील/ प्रसिद्धीपत्रकातील अटी व शर्थीमध्ये कोणताही बदल नाही.

**सही/-**

**दिनांक : १९/०७/२०२४** **सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**